आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१२ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथे उच्चस्तरीय बैठक
- देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी, विविध ठिकाणी बुद्धवंदनेचं आयोजन
- भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी झाल्यानंतर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी, सेन्सेक्स २ हजार अंकांनी वधारला
- क्रिकेटपटू विराट कोहलीची कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

**आणि**

- खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र ८० पदकांसह अव्वल स्थानी कायम

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथे उच्चस्तरीय बैठक होत आहे. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख आणि अनेक वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या सीमावर्ती भागात, सीमेवर तसंच देशातल्या आंतरराष्ट्रीय सीमेवर काल रात्रीपासून आज पहाटेपर्यंत सर्वत्र शांतता होती, असं भारतीय लष्करानं म्हटलं आहे. पाकिस्तानकडून कुठेही हल्ले किंवा चिथावणीखोर हालचालींचं वृत्त नाही. दरम्यान, गेल्या शनिवारी पाकिस्ताननं सीमेवर केलेल्या गोळीबारात, शहीद झालेले सीमा सुरक्षा दलाचे उपनिरीक्षक एम. डी. इम्तियाज

यांचा मृतदेह आज सकाळी दिल्लीत आणण्यात आला. बिहारमधल्या छपरा या त्यांच्या मूळ गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

<><><><><>

भारतानं ऑपरेशन सिंदुरच्या माध्यमातून संपूर्ण जगाला दहशतवादाविरुद्धच्या लढाईचा एक निर्णायक संदेश दिला आहे, असं भाजपानं म्हटलं आहे. भाजपाचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही भूमिका स्पष्ट केली. पाकिस्तानला एकटं पाडून दहशतवादाविरुद्धचा लढा अधिक तीव्र करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जगभरातल्या २० राष्ट्रांच्या प्रमुखांशी थेट चर्चा केल्याचं आणि सौदी अरेबिया, अमेरिका आणि अनेक इस्लामिक राष्ट्रांनी भारताच्या भूमिकेला  पाठिंबा दिल्याचं त्यांनी सांगितलं. भारतानं पाकिस्तानमधले दहशतवाद्यांचे नऊ अड्डे नेस्तनाबूत केलं असून यामध्ये  लष्कर ए तैयबा, हिजबुल मुजाहिदीन आणि जैश ए मोहम्मद सारख्या दहशतवादी संघटनांचे तळ होते, असं ते म्हणाले.

<><><><><>

भारत आणि पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर नागरी उड्डाणांसाठी बंद केलेली ३२ विमानतळं आता सुरू झाली आहेत. भारतीय विमानतळ प्राधिकरणानं आज पत्रकाद्वारे ही माहिती दिली. याबाबतची अद्ययावत माहिती मिळवण्यासाठी प्रवाशांनी थेट विमान कंपन्यांशी संपर्क साधावा, असंही प्राधिकरणानं सांगितलं आहे.

<><><><><>

देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी केली जात आहे.  बिहारमध्ये बुद्धगया इथं थायलंड, व्हिएतनाम आणि म्यानमार या देशांमधून लाखो भाविक बुद्धजयंतीनिमित्त दाखल झाले आहे. यानिमित्तानं  महाबोधी मंदिरात विशेष प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं.  नागपूर जिल्ह्यात कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पल इथंही

आज विशेष बुद्ध वंदना आयोजित करण्यात आली होती. कोल्हापुरात विविध सामाजिक शैक्षणिक संस्था संघटनांनी भगवान बुद्धांच्या पुतळ्याला तसंच प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. तर बीड जिल्ह्यात अंबाजोगाई शहरासह ठिकठिकाणी धम्म रॅली काढण्यात आली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. सत्य, समानता आणि सौहार्द या तत्वांवर आधारित भगवान बुद्धांची शिकवण मानवतेसाठी मार्गदर्शक असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

आधुनिक नर्सिंगच्या संस्थापक फ्लोरेन्स नाईटिंगेल यांच्या जयंतीनिमित्त आज जगभरात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला जात आहे. ‘आमच्या परिचारिका-आमचं भविष्य’ ही यंदाच्या दिनाची मध्यवर्ती संकल्पना असल्याचं आंतरराष्ट्रीय परिचारिका परिषदेनं म्हटलं आहे.

परिचारिकांचं हितरक्षण केल्यास पर्यायानं देशाची आरोग्यव्यवस्था तसंच समाजाची कार्यक्षमता सुधारेल आणि प्रगती सहजसाध्य होईल, असं केंद्रीय आरोग्य मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी समाजमाध्यमांवर म्हटलं आहे. परिचारिकांची करुणावृत्ती आणि कर्तव्यकठोरता यांच्याप्रती त्यांनी आदर व्यक्त केला आणि समाजकल्याणासाठी आपलं आयुष्य वेचणाऱ्या परिचारिकांचा समाजानं योग्य आदर ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी झाल्यानंतर आज सकाळी भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स २ हजारांहून अधिक अंकांनी वधारला तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्येही ७००हून अधिक अंकांची वाढ दिसून आली. परकीय गुंतवणूकदारांनी केलेली गुंतवणूक आणि

जागतिक पातळीवरचे सकारात्मक संकेत यांमुळे ही वाढ दिसून आल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी भारतीय शेअर बाजारात चालू महिन्यात १४ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. डिपॉझिटरीच्या आकडेवारीनुसार परदेशी गुंतवणूकदारांनी ९ मे पर्यंत शेअर बाजारात १४ हजार १६७ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. सोबतच या गुंतवणूकदारांनी ३ हजार ७२५ कोटी रुपये काढून घेतले आहेत. एप्रिल महिन्यात झालेल्या ४ हजार २२३ कोटी रुपये गुंतवणुकीनंतर शेअर बाजाराला सकारात्मक गती मिळाली आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेटपटू विराट कोहलीने आज कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्याने समाज माध्यमावर ही माहिती दिली आहे. विराटने आत्तापर्यंत १२३ सामन्यांमध्ये ४६ पूर्णांक ८५ शतांशच्या सरासरीने ९ हजार २३० धावा केल्या आहेत. त्याच्या १४ वर्षांच्या कारकिर्दीत सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि सुनील गावस्कर यांच्यानंतर विराट हा भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा चौथा फलंदाज बनला. ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू ग्रेग चॅपल याच्यानंतर कसोटी कर्णधारपदाच्या पदार्पणात दुहेरी शतकं करणारा विराट कोहली दुसरा क्रिकेटपटू आहे. कोहलीच्या नेतृत्वाखाली २०१९ मध्ये भारतीय संघानं ऑस्ट्रेलियामध्ये पहिल्यांदा बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिका जिंकली.

भारतानं २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर कोहलीनं आधीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या टी-२० प्रकारातून निवृत्ती घेतली होती. विराटच्या निवृत्तीनंतर त्याच्या जागी आता शुभमन गिल याचं नाव कर्णधारपदाच्या शर्यतीत आहे.

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत ८० पदकांची लयलूट करत महाराष्ट्रानं पदकतालिकेतलं आपलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. यात ३० सुवर्ण आणि २५ रौप्यपदकांचा समावेश आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्र पदकतालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. कर्नाटक ४२ पदकांसह दुसऱ्या तर राजस्थान २४ पदकांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

खेलो इंडियाचा आज नववा दिवस असून आज दिवसभरात मुष्टियुद्ध, टेनिस आदी खेळांचे सामने होणार आहेत. तसंच कलरीपयट्टू आणि थांग हे दोन नव्यानं समाविष्ट केलेले खेळही आज खेळले जातील.

<><><><>

उत्तराखंडमधल्या केदारनाथ मार्गावर गौरीकुंड इथून घोडे आणि खेचरावरुन होणारी प्रवासी वाहतूक पुन्हा सुरु झाली आहे. इन्फ्लुएंझा या आजारामुळे ही सेवा तात्पुरती बंद करण्यात आली होती. पशुतज्ञांनी सतराशेहून अधिक घोडे आणि खेचरांना वाहतूकीसाठी स्वस्थ घोषित केल्यानंतर ही सेवा सुरू झाली आहे.

<><><><>

गडचिरोली जिल्ह्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगड जिल्ह्याच्या सीमेवर पोलीस आणि नक्षलवाद्यांमधे आज चकमक झाली. या चकमकीत काही नक्षलवादी ठार आणि जखमी  झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. पोलिसांनी नक्षली शिबिरं उद्ध्वस्त केली असून त्यांच्याकडील बंदुका आणि अन्य साहित्य ताब्यात घेतलं आहे.

<><><><>

अमेरिकेत औषधांच्या किमती ३० ते ८० टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला आहे. इतर देशांच्या तुलनेत अमेरिकेत औषधांच्या किंमती अधिक आहेत. औषधनिर्मितीसाठीचं  संशोधन आणि विकास खर्चामुळे  किमती अधिक ठेवाव्या लागतात, असं सांगून औषधनिर्मिती

कंपन्यांनी गेली कित्येक वर्ष अमेरिकन लोकांची फसवणूक केली आहे, असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. मात्र आता नवीन धोरणानुसार अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या औषधांची किंमत इतर कोणत्याही देशाने त्याच औषधासाठी दिलेल्या सर्वात कमी किंमतीइतकी असेल. यामुळे देशातल्या नागरिकांचा आरोग्यसेवेचा खर्च कमी होईल, असं ट्रम्प यांनी सांगितलं. यामुळे मधुमेह आणि कर्करोगावरची औषधं देखील स्वस्त होणार आहेत.

**//<><><><><>//**